# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे

**फोन नं.(०२०) २६०५०६४१** **ई-मेल आयडी** :- sceapune@gmail.com

जा.क्र. रासनिप्रा/प्रतिज्ञापन नमुना/ /सन २०२० दिनांक : ५/ ५ /२०२०
९४३२

वाचावे : - १.महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१
२.शासन अधिसूचना दिनांक ३०/०३/२०१३
३. महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणुक) नियम २०१४ नियम २१(३)
४. जा.क्र. रासनिप्रा/प्रतिज्ञापत्रनमुना/शुध्दीपत्रक/८२५/सन २०१४दिनांक १३/११/२०१४
५. महाराष्ट्र( समितीची निवडणूकी नियम) प्रथम सुधारणा दि.६.०८.२०१८

**प्रस्तावना :**

ज्याअर्थी, वाचावे क्र.१ अन्वये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या दि.१३ ऑगस्ट २०१३ च्या (सुधारणा) अधिनियमातील कलम ७३ कब नुसार राज्यातील सर्व सहकारी संस्थांच्या निवडणुका राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणामार्फत घेण्याची तरतुद आहे, आणि

ज्याअर्थी, वाचावे क्र.२ शासन अधिसूचना दिनांक ३०/०३/२०१३ अन्वये राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाचे गठन करण्यात आले आहे,आणि,

ज्याअर्थी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार ब दि.१२/०९/२०१४ रोजी प्रसिद्ध झालेल्या राजपत्रामध्ये दिनांक ११/०९/२०१४ रोजीची दिनांक महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणुक) नियम २०१४ चे शासन अधिसूचना अधिसुचित होऊन त्या दिवसापासुन हे निवडणुक नियम अमलात आलेले आहेत.आणि,

ज्याअर्थी, वाचावे क्र.४ चे शुध्दीपत्रक दि.१३/११/२०१४ अन्वये परिशिष्ट अ मध्ये अंशतः *दुरुस्ती करुन (रु.१००/-) हे शब्द वगळण्यात आले आहे.* आणि,

ज्याअर्थी, वाचावे क्र.५ महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणुक) नियम २०१४ प्रथम सुधारणा दि.६.०८.२०१८ अन्वये केलेल्या दुरुस्तीनुसार 'शपथपत्र' हया शब्दाऐवजी 'प्रतिज्ञापन' हे शब्द समाविष्ट करण्यात आलेला आहे.

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ७३ क अ नुसार उमेदवाराने अनर्ह नसल्याबाबत महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणुक) नियम २०१४ नियम २१ (३) चे परंतुकान्वये प्रतिज्ञापन देणे बंधनकारक केलेले आहे. त्याअनुषंगाने महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणुक) नियम २०१४ नियम २१(३) नुसार राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाकडून सदर प्रतिज्ञापनाचा नमूना विनिर्दिष्ट करणे आवश्यक आहे.

ज्याअर्थी, *महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ मधील प्रथम सुधारणा दि.०६/०८/२०१८ नुसार नियम २१ (३) चे परंतुकामध्ये सुधारणा केल्या आहेत. सदर सुधारणांनुसार नामनिर्देशन पत्रासोबत उमेदवाराने दाखल करावयाचे 'शपथपत्र' ऐवजी 'प्रतिज्ञापन' दाखल करावयाचे आहे. त्यामुळे शपथपत्रासाठी भरणे आवश्यक असलेले रु.१००/- चे मुंद्राक शुल्क प्रतिज्ञापनासाठी भरणे आवश्यक नाही.*

त्याअर्थी, खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत.

**आदेश**

राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब व उक्त निवडणूक नियमातील नियम २१(३) चे परंतुकान्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार, प्राधिकरण, नामनिर्देशन पत्रासोबत उमेदवाराने दाखल करावयाच्या प्रतिज्ञापनाचा नमुना विनिर्दिष्ट केला आहे व तो परिशिष्ट 'अ' नुसार या आदेशासोबत जोडला आहे. सदरच्या सोबत जोडलेल्या नमुन्यात उमेदवाराने उमेदवारी अर्जासोबत प्रतिज्ञापन देणे आवश्यक राहिल.

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण यांचे निर्देशनुसार.**

२०/४/२०२०
(यशवंत गिरी)
**सचिव**
**राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**

प्रति,

१. संबंधित जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी (सर्व)
२. तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)
३. संबधित सर्व निवडणूक निर्णय अधिकारी

# परिशिष्ट " अ "

**नामनिर्देशन पत्रासोबत उमेदवाराने दाखल करावयाचे प्रतिज्ञापन**

**(पहा महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चा नियम २१(३) )**

---

मी ..........................................राहणार...............................तालुका.......................जिल्हा..............

व्यवसाय...................................वय.............. आज दिनांक .................. वार .................... रोजी .......................

........................................................................................ या सहकारी संस्थेच्या निवडणुकीसाठी, या व्दारे प्रतिज्ञापुर्वक दृढकथन करतो की,

मी, उक्त संस्थेचा सभासद असून उक्त संस्थेसह, मी सभासद असलेल्या सर्व सहकारी संस्थांबाबत, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ७३ कअ मधील मधील तरतुदी अन्वये कोणतीही अनर्हता धारण करीत नाही.

**सत्यापन**

मी, वर नांव असलेला अभिसाक्षी, असे सत्यापित व घोषित करतो की, या प्रतिज्ञापनातील मजकूर माझ्या माहिती प्रमाणे व श्रध्देप्रमाणे खरा व बिनचूक आहे.यातील कोणताही भाग खोटा नाही व त्यातून कोणतीही गोष्ट दडवून ठेवलेली नाही.

दिनांक ......................... रोजी सत्यापित केले.

**अभिसाक्षी**

**नाव -**

२७/०८/२०२०

**(यशवंत गिरी)**
**सचिव**
**राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण**
**महाराष्ट्र राज्य, पुणे-१.**